# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांकःगणवेष-३४०३/प्र.क्र. १२६/२००४/२९ दि.२६ मार्च, २००८ अन्वये 'चतुर्थश्रेणी शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले गणवेश कार्यालयीन वेळेत परिधान करणे आवश्यक आहे. तथापि या सूचनांचे काटेकोरपणे पालन होत नाही असे निदर्शनास आल्यामुळे कार्यालयीन वेळेत गणवेश परिधान न करणाऱ्या शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांविरूध्द दि.३१ जानेवारी, १९८५ चे शासन परिपत्रक क्रमांक-पोषाख-१०८४/११२/२९, तसेच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-गणवेश-३४०२/प्र.क्र. ११३/२००२/२९, दिनांक ३१ ऑगस्ट, २००२ अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करण्याच्याही सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत' असे नमूद करण्यात आले आहे.

विद्यापीठामार्फत वर्ग-४ मधील फिल्ड कलेक्टर, जमादार, हवालदार, शिपाई, खानसामा, वाहनचालक, स्वीपर, पंप ऑपरेटर, गवंडी, सुतार, प्लंबर, मिस्त्री, माळी, तारतंत्री, प्रयोगशाळा परिचर, ग्रंथालय मदतनीस, सुरक्षा रक्षक या पदांना गणवेश (टोपीसह) नियमितपणे देण्यात येतात.

विद्यापीठामार्फत वर्ग-४ मधील सेवकांना कार्यालयाने ठरवून दिलेले गणवेश वर्ग-४ चे काही सेवक परिधान करीत नाहीत, असे मा.वरिष्ठांच्या वारंवार निदर्शनास येत आहे. यानुसार संबंधित सेवकांना यापूर्वीदेखील परिपत्रकाद्वारे, लेखी सूचना तसेच, मौखिकरित्याही वारंवार सूचना देऊनही सदरचे सेवक गणवेश परिधान करीत नाहीत. सदर बाब ही कार्यालयीन शिस्तीस धरून नाही.

तेव्हा याबाबत सर्व संबंधितांना आदेशान्वये कळविण्यात येते की, येथून पुढे कार्यालयामार्फत देण्यात आलेले गणवेश (टोपीसह) कार्यालयीन वेळेत परिधान करणे बंधनकारक आहे. जे सेवक येथून पुढे कर्तव्यावर असताना गणवेशाचा वापर करणार नाहीत, अशा सेवकांवर सेवानियमानुसार तात्काळ कारवाई करण्यात येईल.

तसेच सर्व अधिविभाग व प्रशासकीय विभागप्रमुख, जमादार यांच्या आपल्या विभागातील वर्ग-४ मधील सेवकांनी उपरोक्त आदेशाचे पालन केले नसल्याचे निदर्शनास आल्यास, त्यांनी त्याच दिवशी तात्काळ आस्थापना विभागास लेखी अवगत करावे. जेणेकरून संबंधितांवर तात्काळ योग्य ती कारवाई करणे सुलभ होईल.

कुलसचिव

जा.क्र.आस्थापना/1865

दिनांक : 24 NOV 2020

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा.कुलसचिव व समकक्ष अधिकारी
३. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
४. मा.कुलगुरु, मा.कुलसचिव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, यांच्या कार्यालयास माहितीसाठी.
५. इंटरनेट सेल - सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. (INTRANET)

**टीपः- सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व सेवकांच्या निदर्शनास आणावे.**